# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

ता. जावली, जि. सातारा

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

**२०१८ – २०१९**

१. विशेष शिबिराचे ठिकाण - **तळोशी, ता. जावली, जि. सातारा**

२. विशेष शिबीर दिनांक - **दि. १८/१२/२०१८ ते दि. २४/१२/२०१८**

३. विशेष शिबिराची सहभागी स्वयंसेवक संख्या - एकूण : **५०** स्त्री – २० , पुरुष: ३०

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर "शिक्षण व आरोग्य विकास" हे ब्रीदवाक्य घेऊन मौजे तळोशी ता. जावली जि. सातारा या ठिकाणी संपन्न झाला. या शिबिराचे उद्घाटन मा. सौ. कांताबाई सुतार (सदस्य,पंचायत समिती जावली.)व मा. श्री. संजय शिंदे (उपसंपादक दैनिक सकाळ,सातारा) हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.अशोकराव नवले (विश्वस्त,जयवंत प्रतिष्ठान हुमगाव)हे होते.तसेच या कार्यक्रमासाठी मा.श्री.महेश देशमुख,मा.श्री.रमेश चव्हाण ,प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमोडे,डॉ.प्रमोद घाटगे,तळोशी गावचे सरपंच मा.श्री. संतोष चिकणे,उपसरपंच मा.श्री.बाबुराव चिकणे,श्री.सचिन बैलकर,सर्व ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ ,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

**. शिबिरातील उपक्रम :**

१) ग्रामस्वच्छता

२) पिण्याच्या पाण्याची विहीर परिसर स्वच्छता

३) समतोल चर

४) शोष खड्डे

५) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता

६) मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या सुरक्षा भिंतीचे पडलेले बांधकाम पूर्ण केले

७) जन्निमाता मंदिर परिसर स्वच्छता

८) पाणंद रस्त्यावरील वाढलेली झाडेझुडपे तोडली

९) मोफत आरोग्य तपासणी शिबीर

१०) हळदी – कुंकू समारंभ

११) सांस्कृतिक कार्यक्रम

**प्रबोधन कार्यक्रम :**

| अ.क्र. | वार /दिनांक | प्रमुख पाहुणे | विषय |
|---|---|---|---|
| १. | बुधवार १९/१२/२०१८ | मा.श्री.विश्वनाथ भिलारे मु.भिलार | दैनंदिन जीवनात योगाचे महत्व |
| २. | गुरुवार २०/१२/२०१८ | मा.श्री.ए.ए.मोरे तालुका कृषी अधिकारी,जावली | मानवी जीवनात जलसौवर्धनाचे महत्व |
| ३. | शुक्रवार २१/१२/२०१८ | मा.डॉ.सौ.साधना कवारे वैदकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र केळघर | युवकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य |
| ४. | शनिवार २२/१२/२०१८ | मा.श्री.जीवन माने सहाय्यक पोलीस निरीक्षक,मेढा | बलशाली भारतासाठी बलशाली युवक |
| ५. | शनिवार २२/१२/२०१८ | मा.श्री.सतीश बुद्धे गटविकास अधिकारी,जावली | संवाद युवकांशी |
| ६. | रविवार २३/१२/२०१८ | मा.श्री.संजय शिंदे उपसंपादक दैनिक सकाळ,सातारा | विधायक पत्रकारिता आणि पत्रकारितेविषयी संधी |

**समारोप समारंभ :**

समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक मा.श्री.मोहन कासुर्डे हे होते.तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जयवंत प्रतिष्ठान हुमगाव चे विश्वस्त मा.श्री.दादासाहेब शिंदे हे होते. या समारोप समारंभासाठी प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमोडे,उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे,तळोशी गावचे सरपंच मा.श्री.संतोष चिकणे,उपसरपंच मा.श्री.बाबुराव चिकणे,ग्रामसेवक मा.श्री.विकास सुरवसे,सर्व ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी,ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.या कार्यक्रमावेळी ग्रामपंचायत तळोशी यांचेकडून स्वयंसेवकांना उत्कृष्ठ कामगिरी केलेबद्दल मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र व फुलाचे रोपांचे वाटप करण्यात आले.श्री.सचिन बैलकर व श्री. अक्षय चिकणे यांनी स्वयंसेवकांना मेडल चे वाटप केले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संजय भोसले ,प्रा.श्री.प्रमोद चव्हाण, प्रा.सौ.गायत्री जाधव,प्रा.डॉ.उदय पवार, प्रा.डॉ.सारंगपाणि शिंदे,प्रा.कु.डी.व्ही.देशमुख,प्रा.श्री.शंकर गेजगे, श्री.जगदीश ओंबळे,श्री.आबासाहेब देशमुख सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका ,ग्रामस्थ यांनी प्रयत्न केले.